शनिवार दि. १७ डिसेंबर २०११ सांस्कृतिक

# माडगूळला 'गदिमा गाणी आणि आठवणी'

पुणे दि. १६ (प्रतिनिधी)

कवी ग. दि. माडगूळकर यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त 'गदिमा गाणी आणि आठवणी' या कार्यक्रमाचे आयोजन पुण्याच्या गायिका शुभांगी मुळे यांनी माडगूळ येथे केले. यावेळी ग.दि.मां.ची गाजलेली चित्रपट गीते, भक्तीगीते, भावगीते, रामायणातील गीते, देशभक्तीपर गीते सादर केली. यामध्ये जिवलगा कधी येशील तू, फड सांभाळ तुऱ्याला, बुगडी माझी सांडली ग, अशा गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. हेमंत वाळुंजकर, अविनाश सलगर यांनीही घनघनमाला नभी दाटल्या, झाला महार पंढरीनाथ ही गाणी सादर केली. जयंत साने (हार्मोनियम), संस्मित रुद्र (सिंथेसाईजर), मोहन पारसनीस (तबला), हेमंत पोटफोडे (तालवाद्य) यांनी साथसंगत केली. कार्यक्रम माडगुळे येथील ग. दि. माडगूळकर कलाकार कल्याण मंडळ यांच्यावतीने आयोजित करण्यात आला.